पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, लेखा विभाग
क्र.लेखा/१अ/कावि/५२७/२०१८
दिनांक – १२/११/२०१८

प्रति,
सर्व विभागप्रमुख
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

**विषय:** - "मुख्यलेखापाल" या पदाचे पदनामात झालेल्या बदलाची नोंद घेणेबाबत.

**संदर्भ:** - १) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२३ मे २०१८ रोजीची अधिसूचना
२) शासन आदेश क्र. संलेको२०१७/प्र.क्र.८५/कोषा प्रशा-२ दि. २४/०८/२०१८
३) आदेश क्र. प्रशा/७/कावि/६७५/२०१८ दि.३/११/२०१८

महोदय,

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२३ मे २०१८ रोजीचे अधिसूचनेद्वारे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील १५६००-३९१०० ग्रेड पे ७६००/- या वेतनश्रेणीमधील सहसंचालक दर्जाच्या अधिका-यांना मुख्य लेखा अधिकारी म्हणून प्रतिनियुक्तीने भरणेबाबत अधिसूचीत करण्यात आलेले आहे.

त्यानुसार वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील संदर्भिय क्र. २ चे आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहसंचालक संवर्गातील अधिका-यांच्या पदोन्नती व पदस्थापनेबाबत आदेश निर्गत करण्यात आलेले आहेत. सदर आदेशाचे अनुषंगाने सहसंचालक, लेखा व कोषागारे संवर्गातील अधिकारी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखा अधिकारी म्हणून पदस्थापना देण्यात आलेली आहे.

उक्त शासन आदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील "मुख्यलेखापाल" या अभिनामाच्या पदाचे पदनाम प्रशासन विभागाकडील संदर्भिय क्र. ३ चे आदेशान्वये "मुख्य लेखा अधिकारी" असे बदलण्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी सर्व विभागप्रमुखांना याद्वारे सूचित करण्यात येते की यापुढे "मुख्यलेखापाल" या पदास "मुख्य लेखा अधिकारी" असे संबोधण्यात यावे. तसेच लेखा विभागाचे विभागप्रमुखांकडे कोणताही पत्रव्यवहार करतेवेळी तो "मुख्य लेखा अधिकारी" या नावाने करण्यात यावा.

मुख्य लेखा अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

Scanned by CamScanner